## प्रवेश पात्रता निकष

कला अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित केलेली अर्हता :-

अ) मुलभूत अभ्यासक्रम - गुणानुक्रमे पुढीलप्रमाणे राहील.

१) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + इंटरमिजिएट अे ग्रेडचे मुल्यांकन: ८० =एकूण बेरीज

२) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + इंटरमिजिएट बी ग्रेडचे मुल्यांकन : ६० =एकूण बेरीज

३) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + इंटरमिजिएट सी ग्रेडचे मुल्यांकन : ५० =एकूण बेरीज

टिप :- विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण न होता तो केवळ महाराष्ट्र राज्याची शालांत प्रमाणपत्र परीक्षा ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) हा विषय वार्षिक परीक्षेसाठी घेऊन उत्तीर्ण झाला असल्यास त्या विषयात मिळणा-या ग्रेडचा विचार करण्यात यावा. प्रवेशाच्या बाबतीत इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असल्यास लांत परीक्षेतील ड्रॉईंग या विषयातील गुणांचा विचार करण्यात येऊ नये.

४) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील अे श्रेणीचे मुल्यांकन : ४० = एकूण बेरीज.

५) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील बी श्रेणीचे मुल्यांकन : ३० = एकूण बेरीज.

६) शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील सी श्रेणीचे मुल्यांकन : २५ = एकूण बेरीज.

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.एईडी-१२९४/(२२५)/साशि-५, दि.२०.९.१९९४)

मुलभूत अभ्यासक्रमाला प्रवेश देतेवेळी विद्यार्थी जर शालांत परीक्षेत काही विषयातील सूट घेऊन उत्तीर्ण झाला असेल तर त्याची शालांत परीक्षेतील गुणवत्ता अजमावताना त्यातील टक्केवारी केवळ ३५% इतकी धरण्यात यावी.

मुलभूत पदविका अभ्यासक्रमासाठी शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन विद्यार्थ्यांप्रमाणेच जून्या म्हणजेच त्यामागील वर्षात शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन विद्यार्थ्यांसमवेत गुणवत्तेनुसार मुलभूत अभ्यासक्रमाच्या वर्गात प्रवेश देण्यात यावेत. उदा. मुलभूत पदविका अभ्यासक्रमासाठी सन २०१९ सालात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व सन २०१८ मध्ये तसेच सन २०१७ या साली उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांना मुलभूत अभ्यासक्रमाच्या वर्गात नवे विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात यावेत. त्याप्रमाणे दोन वर्षापूर्वी शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची शालांत परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीतून २% कमी करुन टक्केवारी धरावी. म्हणजे सन २०१६ चा विद्यार्थी जूना विद्यार्थी समजून त्याची शालांत परीक्षेची टक्केवारी २% ने कमी करुन अर्ज स्विकारण्यात यावेत. या क्रमाने जितकी वर्षे अगोदर विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल तितके टक्के कमी करुन अर्ज स्विकारण्यात यावेत. या क्रमाने जेवढी वर्षे अगोदर विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल तेवढे टक्के कमी करुन शालांत परीक्षेचे गुण धरण्यात यावेत व अर्ज स्विकारण्यात यावेत. याप्रमाणे सर्व नव्या व जून्या विद्यार्थ्यांच्या आलेल्या अर्जांची गुणवत्तेनुसार एकत्रित यादी तयार करण्यात यावी. शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे व महाराष्ट्र शासनाची इंटरमिजिएट ड्रॉईंग गेड परीक्षा उत्तीर्ण असणे अथवा प्रविष्ट असणे आवश्यक असून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी त्याच वर्षात इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. अशा विद्यार्थ्यांनाच फक्त प्रवेश देण्यात यावा. इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण नसतील अशा विद्यार्थ्यांस प्रवेश देतांना प्रवेशासाठी किमान पात्रता असलेल्या परीक्षेत, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांस ५०% आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांस ४५% गुण असणे आवश्यक राहील. त्याच वर्षात संबंधित विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द करण्यात यावा.

(शा.नि.क्र.अेडीआर-२००७/(११४/०७)अ/तांशि-७, दि.३१.८.२००७)

इतर राज्यातील शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी महाराष्ट्र शासनाची इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असणे अथवा प्रविष्ट असणे आवश्यक असून त्याच वर्षात इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. त्याच वर्षात संबंधित विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द करण्यात यावा.

मुलभूत अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्ती तत्त्वावर प्रवेश देण्यात येऊ नयेत.

ब) <u>विशिष्ट कला विषयक पदविका प्रथम वर्ष :</u>

मुलभूत वर्गाची वार्षिक परीक्षा सार्वजनिक असल्याने त्या परीक्षेत उत्तीर्ण होणारा विद्यार्थी राज्यातील कोणत्याही कला संस्थेत विशिष्ट अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या वर्गाकरिता प्रवेशासाठी अर्हतापात्र आहे.

विशिष्ट अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या नवीन विद्यार्थ्यांप्रमाणेच मागील कोणत्याही वर्षी मुलभूत अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन विद्यार्थ्यांसवेत गुणवत्तेनुसार विशिष्ट अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश देण्यात यावेत.

क) नवीन <u>कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित केलेली अर्हता</u>

कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (नवीन) अभ्यासक्रम हया प्रथम वर्ष वर्गातील प्रवेशाकरिता महाराष्ट्र राज्याची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १२ वी) कला, वाणिज्य व शास्त्र यापैकी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण तसेच महाराष्ट्र राज्याची इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असणे किंवा प्रविष्ट असणे आवश्यक असून त्याच वर्षात तो इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण नसतील अशा विद्यार्थ्यांस प्रवेश देतांना प्रवेशासाठी किमान पात्रता असलेल्या परीक्षेत, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांस ५०% आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांस ४५% गुण असणे आवश्यक राहील. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनाच गुणवत्तेनुसार कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश देण्यात यावेत. त्याच वर्षात संबंधित विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द करण्यात यावा. (शा.नि.क्र.अेडीआर-२००७/(११४/०७)अ/तांशि-७, दि.३१.८.२००७)

कला शिक्षक प्रशिक्षण पदविका प्रथम वर्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम द्वितीय वर्षाला गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त वर्गात आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांखेरीज इतर संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नयेत. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत अशा प्रवेशास मान्यता देण्याचे अधिकार कला संचालकांना राहतील. तसेच मुक व बधीर विद्यार्थ्यांना कला शिक्षक प्रशिक्षण वर्गात प्रवेश देण्यात येऊ नयेत.

विशिष्ट अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश देतेवेळी विद्यार्थी जर मुलभूत अभ्यासक्रम परीक्षेत काही विषयातील सूट घेऊन उत्तीर्ण झाला असेल तर त्याची मुलभूत अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील गुणवत्ता अजमावताना उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असणारे किमान गुण (४०%) विचारात घ्यावेत. निरनिराळया कला शाखेतील द्वितीय (इंटरमिजिएट), तृतीय (ॲडव्हान्स) आणि पदविका (डिप्लोमा), आर्ट मास्टर (सुट्टीतील/अंशकालीन) अभ्यासक्रमासाठी विहित नियम:-

१) आपल्या संस्थेतून एलिमेंटरी व ॲडव्हान्स - रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध/आर्ट अँड क्राप्ट वर्गात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे इंटरमिजिएट व डिप्लोमाच्या वर्गात त्यांचेकडून शुल्क स्विकारुन प्रवेश देण्याची कार्यवाही करावी. प्रवेशाच्या अंतिम तारखेबाबतची लेखी सूचना निकालपत्राबरोबर विद्यार्थ्यांना पाठविण्यात यावी. इंटरमिजिएट (रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध/आर्ट अँड क्राप्ट) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ८ दिवसाच्या आत ॲडव्हान्स वर्गात प्रवेश घ्यावा असे विद्यार्थ्यांना कळवावे.

२) आपल्या संस्थेमध्ये इंटरमिजिएट, ॲडव्हान्स व डिप्लोमा या वर्गात बदलीने प्रवेश घेण्यासाठी इतर संस्थेतील विद्यार्थ्यांकडून/संस्थांमार्फत काही अर्ज आले असल्यास विद्यार्थी पूर्वीच्या संस्थेत कोणत्याही परिस्थितीत प्रवेश घेऊ शकत नाहीत याबाबतचे विद्यार्थ्यांचे लेखी निवेदनासह पूर्वीच्या संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला तसेच बदली प्रवेशासंबंधीची इतर आवश्यक कागदपत्रांची

पुर्तता करुन घेऊन अशी बदली प्रकरणे संस्थेच्या स्तरावर निकाली काढावीत. कोणत्याही परिस्थितीत या संचालनालयाकडे अशी बदली प्रकरणे पाठविण्यात येऊ नयेत. अशा बदली प्रकरणांबाबत या कार्यालयाकडून कोणतीही दखल घेतली जाणार नाही. बदली प्रवेशासंबंधीची कार्यवाही संबंधित अभ्यासक्रम वर्गाची प्रवेश प्रक्रिया चालू झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे कालावधीतच करण्यात यावी. एक महिन्याच्या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत बदली प्रवेशासंबंधीची कार्यवाही करु नये. बदली प्रवेश हे प्रचलित प्रवेश नियम व गुणवत्तेनुसारच देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत प्रचलित प्रवेश नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. अन्यथा उद्भवणा-या परिस्थितीस संबंधित संस्था/प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.

३) आर्ट मास्टर (सुट्टीतील/अंशकालीन) अभ्यासक्रमासाठी खालील अर्हताधारक शिक्षक प्रवेशासाठी पात्र आहेत.

अ) कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (अे.टी.डी.) उत्तीर्ण व त्यानंतर प्राथमिक/माध्यमिक शाळेत पूर्णवेळ कला शिक्षक म्हणून किमान ३ वर्षे कला विषय शिकविण्याचा अनुभव किंवा

ब) जी.डी. आर्ट पदविका उत्तीर्ण व त्यानंतर प्राथमिक/माध्यमिक शाळेत किमान ५ वर्षे कला विषय शिकविण्याचा अनुभव. (शासन निर्णय क्र.एईडी-१४०३/७८५७/(१०१)/तांशि-४, दि. १८ मे,२००४)

४. भारतीय संविधानानुसार व मंडळ आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार कला विषयक शिक्षण संस्थांत प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण ठेवण्यात यावे. मात्र प्रवेश देताना आरक्षण ५०% पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जातीतील बौद्ध धर्म स्विकारलेल्या व्यक्ती. | १३ % |
| २) | अनुसूचित जमाती ..... ..... | ०७ % |
| ३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) ..... ..... | ०३ % |
| ४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९९ पूर्वीच्या २८ तत्सम जाती) ..... | २.५ % |
| ५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) ..... ..... | ३.५ % |
| ६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) ..... ..... | ०२ % |
| ७) | विशेष मागास प्रवर्ग ..... ..... | ०२ % |
| ८) | इतर मागासवर्गीय ..... ..... | १९ % |
| ९) | सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) (मराठा) ..... | १२% |
| १०) | आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग ..... | १०% |
| | एकूण | ७४ % |

वर नमूद केलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या आरक्षणाखेरीज राखीव जागांचे आरक्षण ठेवावे.

| | | |
|---|---|---|
| १) | विद्यार्थीनी (प्रवर्गानुसार) ..... ..... ..... | ३० % |
| २) | संरक्षण दलातील कर्मचा-यांची मुले (जास्तीत जास्त ५ जागा)..... | ०५ % |
| ३) | अपंग ..... ..... ..... | ०५ % |

(टिप:-वरील आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल)

मागासवर्गीयांच्या एखाद्या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने इतर प्रवर्गातून उमेदवार भरण्याची तरतूद करताना अशा त-हेने उपलब्ध मागासवर्गीयांच्या संख्या मुळ आरक्षण + अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरुन ५०% पेक्षा अधिक असणार नाही.

महिलांचे ३०% आरक्षण विनाराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गांसाठी लागू राहील. तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण राहील. उदा. जसे की, सध्या संविधानातील तरतूदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३% जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३० % आरक्षण हे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात याव्यात व या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात याव्यात. अशाप्रकारे इतर सर्व प्रवर्गांकरिता सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३०% समांतर आरक्षण ठेवण्यात यावे.

(भा. ना.तिखे)
निरीक्षक
चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(राजीव मिश्रा)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.